दै. तरुण भारत
20 जानेवारी 2018

# कमला कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

कमला कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर पडवळवाडी येथे उत्साहात पार पडले. या शिबिरात स्वच्छता व आरोग्य, शिक्षण, अंधश्रध्दा निर्मुलन, स्त्रीभ्रूण हत्या, प्लॅस्टिक मुक्त पडवळवाडी, वृध्दांची देखभाल आदींचा अभ्यास केला. मुला-मुलींची सरासरी चा सर्वेक्षण केले असता १ हजार मागे ७८० मुलींचे प्रमाण असल्याचे लक्षात आले. अनिल चौगले यांनी सकारात्मक जीवनशैली, संजय पाटील यांनी गिरीभ्रमण व निसर्गाची काळजी, प्रा. व्ही. डी. तडसरे यांनी तणावमुक्त आनंदी जीवन, डॉ. हरिभाऊ वनमोरे यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तीमत्व विकास, सुनिता कांबळे यांचे रोजगार मित्र या विषयावर मार्गदर्शन केले.